**<u>दोषारोप निश्चितीपूर्वीच्या सा. क्र.१ च्या पुराव्याचा</u>**

**<u>आरोपीं तर्फे उलटतपास – श्री. जी. टी. ठाकूर वकील.</u>**

२. मी तक्रारीवरती मजकूर समजून घेऊन निशाणी अंगठा केला आहे. मी करत असलेले अर्ज व दाखल कागदपत्रे समजून त्यावरती निशाणी अंगठा करते. मी समजून घेतल्या शिवाय कोणत्याही कागदपत्रावरती निशाणी अंगठा करत नाही. मला न्यायालयात दाखल केलेल्या दाव्याचा क्रमांक सांगता येणार नाही. मी तो दावा जमीन मिळण्यासाठी दाखल केला आहे. मी त्या दाव्याकामी हजर राहून संपुर्ण माहिती घेते. मी माझ्याकडील संपुर्ण माहिती वकिलांना देते.

३. संगिता संजय पाटील माझी मुलगी असून ती मुंबईला राहते. मी दिसत नसलयामुळे संगिता सोबत राहते. दिवाळी झाल्यानंतर चार दिवसांनी आरोपी माझ्याकडे आले होते. मला त्या दिवसाची तारीख व वार सांगता येणार नाही. त्या दिवशी आरोपी क्र.१, त्याचा चुलत भाऊ महादेव कोकीतकर आणि मुंबईचे दोन अनोळखी लोक असे चार लोक आले होते. मी आरोपी क्र.१ सोबत आलेल्या लोकांची माहिती माझ्या वकिलांना अथवा पोलिसांना दिली नव्हती. मला त्यांची माहिती देण्यास काय अडचण होती ते आता आठवत नाही. मला कोणतीही अडचण नव्हती.

४. आम्ही त्यांनी बोलावल्यामुळे मेंढोली येथील आनंदा कातकरच्या घरी आलो होतो. मला त्या दिवशी कोणती तारीख व वार होता याबाबत सांगता येणार नाही. त्यावेळी मी, माझी मुलगी व जावई असे तिघे आलो होतो. माझ्या सगळ्या बाबी माझा जावई संजय पाटील याला माहिती आहेत. मी जावयाला विचारल्या शिवाय काहीही करत नाही. मी मुंबईवरुन गावी का आले याची माझ्या मुलीला व जावयाला माहिती होती. त्याबाबत माहिती असल्यामुळे माझी मुलगी व जावई माझ्या सोबत आज–याला आले होते. मला अथवा माझ्या मुलीला त्रास झाल्याचे जावयाला आवडत नाही.

५. माझ्या बाजूने माझा जावई सर्व बाजू मांडतो. तसेच अडचणीचा निपटारा करतो. माझ्या जावयाने आरोपीं विरोधात आजपर्यंत मला त्रास दिल्याबाबत कोठेही

तक्रार दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी त्रास दिलेला नसल्यामुळे जावयाने तक्रार दिलेली नाही. माझ्या जावयाने न्यायालयात तक्रार दिलेली आहे. मी त्या तक्रारीची कागदपत्रे हजर करणार आहे.

६. सर्व आरोपी दोन ट्रॅक्स गाडया घेऊन आले होते. त्यांनी आम्हाला जुन्या न्यायालयाच्या इमारती जवळ आणले होते. त्या गाडयांमध्ये माझ्या सोबत माझी मुलगी, जावई, नारायण घुरे आणि आप्पा चौगुले आले होते. आरोपींनी नाव लावून देतो असे म्हणाल्यामुळे आम्ही आमच्या मर्जीने गाडीत बसून आलो होतो.

प्रश्न – तुम्ही घराचे व शेतीचे हक्कसोडपत्र करण्यासाठी आरोपीं सोबत आज–याला आला होता ?

उत्तर – मला हिस्सा पाहिजे असल्यामुळे आम्ही आलो होतो.

७. आमच्यात गाडीतून येताना व आज–यात आल्यावर आरोपी जमीन देतो म्हणाल्यामुळे वादावादी झाली नव्हती. मला आज–याचे दुय्यम निबंधक कार्यालय कोठे आहे याची माहिती आहे. आम्ही आरोपींनी केलेला कागद काय आहे याची माहिती घेतली होती. साक्षीदार स्वतःहून सांगते, त्यानंतर आरोपींनी कागद बदलले होते. माझ्यासोबत आलेल्या लोकांनी देखील कागदाची माहिती घेतली होती. आरोपींनी आम्हाला दाखवलेला कागद दुय्यम निबंधक कार्यालयात दिला होता. मी व माझ्या सोबत आलेल्या लोकांनी त्या कागदावरती आरोपी जमीन देतो म्हणाल्यामुळे स्वाक्ष–या केल्या होत्या.

८. आम्हाला त्या कागदाची जावयाने नक्कल काढल्यानंतर माहिती झाली होती. जावयाने ती नक्कल सोमवारी काढली होती. आम्ही तो कागद पाहिल्यानंतर न्यायालयात तक्रार करण्यासाठी आलो होतो. त्यावेळी माझ्या सोबत माझी मुलगी, जावई, नारायण धुरे व आप्पा चौगुले आले होते. आम्ही न्यायालयात तक्रार दाखल केली होती. मी त्याची कागदपत्रे हजर करु शकते. आम्ही नक्कल मिळाल्यानंतर चौथ्या दिवशी आरोपीं विरोधात पोलिसांकडे तक्रार केली होती. मी त्या तक्रारी बाबत दोन वेळा पोलिसांकडे गेले होते. आम्ही पोलिसांनी कारवाई केली नसल्यामुळे त्यांच्या वरिष्ठांकडे तक्रार केली होती. मी त्याची कागदपत्रे

दाखल करु शकते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फसवणूक केलेली नसल्यामुळे मी त्यांच्या विरोधात पोलिसांच्या वरिष्ठांकडे कारवाई करत नसल्या बाबत अर्ज केलेला नाही.

९. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या मुलीने पोलिसांसमोर आरोपीं विरुध्द दिलेली तक्रार मागे घेत असल्याचे लिहून दिलेले आहे. त्यावेळी पोलिस ठाणे आणि दुय्यम निबंधक कार्यालय जवळ–जवळ होते. मला दस्त झालेल्या दिवशी पोलिसांकडे तक्रार द्यायला अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणतीही चुकीची गोष्ट केलेली नसल्यामुळे मी दस्त झालेल्या दिवशी तक्रार दिली नव्हती.

**१०.** मला दस्त झाल्यानंतर न्यायालयातील प्रकरणाची कोणती तारीख होती ते सांगता येणार नाही. साक्षीदार सांगते, त्या दिवशी सोमवार होता. आम्ही सोमवार च्या दिवशी आमच्या वकिलांना हककसोडपत्र केल्याची माहिती दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आम्ही आरोपी क्र.१ ने दिलेल्या अर्जाला ना हरकत दिलेली आहे.

**११.** हे म्हणणे खरे नाही की, दस्त झाल्यानंतर आम्ही लवकरात लवकर न्यायालयातील प्रलंबित दाव्यात तक्रारअर्ज दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र.१ ने त्याच्या भावा व इतरांसह मुंबई येथे येऊन आम्हाला वाटणी करुन देतो असे सांगितल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींनी मला, मुलीला व जावयाला बळजबरीने गाडीत बसवून आज–याला आणल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींनी केलेला कागद मला वाचून दाखवला नसल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींनी हिस्सा दिल्याचे सांगून आमच्या हक्कसोडपत्राच्या कागदावर सहया घेतल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी तो कागद आरोपींनी आमच्या सोबत आलेल्या आप्पासाहेब चौगुले आणि नारायण घुरे यांना दाखवला नसलयाचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींनी फसवणूक करुन स्वाक्ष–या घेतल्याचे खोटे सांगत आहे.

**१२**. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींनी फसवणूक केल्याची बाब जावयाने नकला काढल्यावर समजल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीवरती त्यांनी कारवाई केली नसल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दाखल केलेल्या दिवाणी दाव्यात आमच्या बाजूने कोणताही आदेश झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या बाजूने आदेश झालेला नसल्यामुळे आमचा आरोपींवरती राग आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आम्ही आरोपीं विरोधात खोटी केस दाखल केली असून मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – ०८.०६.२०२६.

(आर. पी. थोरे)

आजरा.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.